# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका
## घनकचरा व्यवस्थापन विभाग (मुख्यालय)
### कोटेशन मागविणेची नोटीस

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका घनकचरा व्यवस्थापन विभागाकरिता खालील कामा करिता दि.०८/०२/२०२६ ते दि. १० /०२/२०२६ याकालावधीत कोटेशन प्रसिद्ध करण्यात येत असुन दि. १०/०२/२०२६ रोजी दुपारी १.०० वाजे पर्यंत कोटेशन मागविण्यात येत आहेत.कामाबाबतची संपुर्ण माहिती आरोग्य विभागाकडून घेऊनच कोटेशन भरावीत.नंतर कोणत्याही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. तसेच कोटेशन भरताना सर्व करासहीत व खर्चासहीत भरावीत तद्नंतर कोणत्याही कारणास्तव जास्त मागणीचा विचार केला जाणार नाही.कमी किंवा जास्त दराचे कोटेशन मंजुर अथवा नामंजुर करणे अगर सर्वच कोटेशन नाकारणेचा अधिकार मा.आयुक्त सो. यांनी राखुन ठेवला आहे.उशीरा आलेले कोटेशन कोणत्याही कारणास्तव स्विकारले जाणार नाहीत.

---

भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे कार्यरत असलेले पोकलन,डोझर व जेसीबी मशीन कार्यन्वित करणेसाठी ६ महिन्याच्या कालावधीसाठी वाहनचालकाची आवश्यक आहे.

तरी खालील तपशीला नुसार इच्छुक संस्था यांचेकडुन दरपत्रक मागविण्यात येत असुन सोबत खालील दस्ताऐवजाची पुर्तता करणे बंधनकारक आहे.

१) संबधित संस्थेचे पॅनकॉर्ड.
२) संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.
३) व्यवसाय कर
४) प्राधिका-या बरोबर हितसंबंधचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छुक संस्थेने एकल दरपत्रक दरपत्रक देण्या बाबतचे हमीपत्र.
५) ईपीएफ नोंदणी प्रमाणपत्र.
६) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षातील आयकर भरल्याचे प्रमाणपत्र
७) महसुल कर (घरपट्टी पावती)
८) जीएसटी नोदणी क्रंमाक
९) पुरविण्यात आलेल्या चालकाकडे जड वाहन चालविणेचा परवाना असणे बंधनकारक आहे.

कामाचा तपशील व वाहनचालकांची संख्या खालील प्रमाणे :-

| अ.क्र. | पोकलन मशीन | जेसीबी मशीन | डोझर मशीन |
|---|---|---|---|
| १ | १ वाहनचालक | २ वाहनचालक | १ वाहनचालक |

सबब विभागासाठी बाह्ययंत्रणेद्वारें वाहनचालक पुरविणे कामी प्रति वाहनचालक दरमहा व पुरवठाधारकाचे नफ्यासह रु.३२,५१२/- व त्यावर १८ % (GST) असे एकुण रु.३८,३६४/- दर येत असुन इच्छुक पुरवठादार यांनी दरपत्रके सर्व करासह व खर्चासह तसेच प्रतिचालक मासिक वेतनासह स्पष्ट लिहुन घनकचरा विभाग येथे सादर करावेत.

उप-आयुक्त (घनकचरा)
भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका

---

तारीख :-
खालील ठिकाणी प्रसिद्ध केली .
मनपा मुख्यालय कार्यालय नोटीस बोर्ड
कोंडवाडा नोटीस बोर्ड
मनपा संकेतस्थळ